निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २२८ वा.
मंगळवार :२१ ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## महाराष्ट्राचे 'व्हिजन डॉक्युमेंट' विकसित भारताचे स्वप्न साकारणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात म्हणजे २०४७ मध्ये विकसित भारताचे स्वप्न पाहिले आहे. या स्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्राचे 'व्हिजन डॉक्युमेंट' निश्चितच महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित विकसित महाराष्ट्र २०४७ सल्लागार समितीच्या बैठकीत व्यक्त केला.



या बैठकीत विकसित महाराष्ट्र २०४७ मसुद्याला सल्लागार समितीने मान्यता दिली. हा मसुदा मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी लवकरच मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे. या मसुद्यात २०२९, २०३५ आणि २०४७ पर्यंत अशा तीन टप्प्यातील विकसित महाराष्ट्राचे ध्येय गाठण्याचा 'रोडमॅप' दिला आहे.

बैठकीस कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे उपस्थित होते, तर शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विकसित महाराष्ट्राचा मसुदा हा ऐतिहासिक दस्ताऐवज आहे. भविष्यात कुठलीही योजना, धोरणे बनविताना या मसुद्याचा उपयोग झाला पाहिजे. हे 'डॉक्युमेंट' महाराष्ट्राला राज्यांसोबत नाही, तर जगासोबत स्पर्धा करण्यास सक्षम बनवेल. या संपूर्ण मसुद्या-चे व्हिडिओ स्वरुपामध्ये ही रूपांतर करण्यात यावे. ज्यातून नागरिकांना सुलभ पद्धतीने तो समजून घेता येईल.

### विकसित महाराष्ट्रासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

विकसित महाराष्ट्र २०४७ च्या मसुद्यासाठी राज्यात १९ जून २०२५ ते २८ जुलै २०२५ पर्यंत सर्व्हे करण्यात आला. यामध्ये राज्यभरातून चार लाख नागरिकांचा प्रतिसाद प्राप्त झाला. या प्रतिसादांमध्ये ३५ हजार 'ऑडिओ मेसेज' चा समावेश होता. तसेच विकासाच्या सूचनांचा जास्त अंतर्भाव होता. त्याचप्रमाणे विविध विभागांच्या विशिष्ट सर्व्हेमध्ये सात लाखांपेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदविला.

यंत्रणांनी यापुढे मंजुरीसाठी येणाऱ्या प्रस्तावांवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे प्रस्ताव स्वीकारण्याची यंत्रणा निर्माण करावी. प्रस्ता-वात उणिवा असल्यास कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावर त्या दूर करण्याचा प्रयत्न करावा, यातून वेळेची फार मोठी बचत होईल, अशी ही यंत्रणा असावी. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रभावी काम करण्यासाठी एलएलएम (लार्ज लैंग्वेज मॉडेल) तयार करावे. उद्योग विभागाने भागीदारीतून विविध योजनांच्या लाभार्थी माहितीसाठी 'क्लाऊड कम्प्युटिंग' वर आधारित व्यवस्था उभारावी. त्याचा उपयोग सर्व यंत्रणांना होईल. राज्याला पुढे नेत असताना भविष्यात कुठलीही अडचण न येणारे शाश्वत विकासाचेच मॉडेल निर्माण करावे, असे आदेशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

हा मसुदा बनविण्यासाठी नागरिकांनी दिलेल्या सूचनांबद्दल मुख्यमंत्र्यांनी आभार व्यक्त करीत नागरिक राज्याच्या विकासाप्रती किती सजग आहे, हे यावरून दिसून येत असल्याचे सांगितले.बैठकीस मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनिषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (नगरविकास) असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, अपर मुख्य सचिव (कृषी) विकासचंद्र रस्तोगी आदींसह विविध विभागांचे प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.




## मित्रासमोर तरुणीवर सामूहिक अत्याचार, सहा जणांना अटक

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी/ प्रतिनिधी/** सर्वत्र दिवाळीची धामधूम असताना महाराष्ट्रात अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. मित्रासमोर तरुणीवर सामूहिक अत्याचार झाला आहे. या प्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. परभणीत ही खळबळजनक घटना घडली आहे.




परभणीच्या जिंतूर तालुक्यातील भोगाव परिसरातील इटोली शिवारात १८ वर्षीय तरुणीवर सामूहिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या घटनेला सहा दिवस उलटले असून जिंतूर पोलीस ठाण्यात सहा आरोपी विरुद्ध अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेनंतर पोलिसांनी जलद गतीने तपास करीत सहाच्या सहा आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी दिली.

या मध्ये एक आरोपी हा अल्पवयीन असल्याची माहिती आहे.

**सविस्तर वृत्त पान नं.३ वर..**












# पोलिस हुतात्मा दिन

आज २१ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत - तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उज-ाळा दिला जातो. २४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६ / ११ च्या पाक पुरस्कृत दहशतव-ादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला.पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन !






## दिवाळी व पाडव्या निमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा...

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित,

### देगलूर महाविद्यालय, देगलूर कार्यकारीणी मंडळ यादी

| अ.क्र. | पदाधिकाऱ्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | श्री प्रकाश निवृत्तीराव पाटील बेम्बरेकर | अध्यक्ष |
| २ | श्री जनार्धन जयराम चिद्रावार | उपाध्यक्ष |
| ३ | श्री डॉ. कर्मवीर पोशट्टी उनग्रतवार | सचिव |
| ४ | श्री राजकुमार राम महाजन | सहसचिव |
| ५ | श्री विलास शंकरराव तोटावार | कोषाध्यक्ष |
| ६ | श्री देवेंद्र बालाजीराव मोतेवार | कार्यकारिणी सदस्य |
| ७ | श्री नारायणराव रामन्ना मैलागिरे | कार्यकारिणी सदस्य |
| ८ | श्री सुर्यकांत गोविंद नारलावार | कार्यकारिणी सदस्य |
| ९ | श्री गंगाधरराव यशवंतराव जोशी | कार्यकारिणी सदस्य |
| १० | श्री रविंद्र काशिनाथअप्पा द्याडे | कार्यकारिणी सदस्य |
| ११ | श्री चंद्रकांत राजन्ना नारलावार | कार्यकारिणी सदस्य |
| १२ | श्री गुरूराज शशिकांत चिद्रावार | स्विकृत सदस्य |
| १३ | श्री विजय पोशट्टी उनग्रतवार | स्विकृत सदस्य |
| १४ | प्राचार्य डॉ. मोहन ना. खताळ | पदसिध्द सदस्य |




## दिवाळी निमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा...

रजि.नं.बीएचआर/पीआरडी/एल-१३८ दिनांक : २१-१२-७० ☎:२२३३३९

### बीड जिल्हा सहकारी मजुर संस्थाचा सहकारी संघ मर्यादित, बीड.

चेअरमन
श्री.बन्सीधर एकनाथराव सिरसाट
अंबाजोगाई जि.बीड

Email : beedmajursm@gmail.com

लक्ष्मण नगर, भगवानबाबा प्रतिष्ठानच्या पश्चिमेस, बार्शी रोड, बीड ता.जि.बीड.

जा.क्र. दि. / /२०



श्री. अमृत श्रीरंग रसाळ
व्हा. चेअरमन



श्री. बी.ई सिरसाट
चेअरमन

**संघाची वैशिष्टे**

१) संघाची स्वत:चे मालकीची दोन मजली इमारत
२) मजूर सह. संस्थेच्या अडी अडचणी सोडवण्यात अग्रेसर
३) सभासद मजूर संस्थांना कामे मिळवुन देण्यात अग्रेसर

**संचालक मंडळ :-**

१) श्री जटाळ बद्रीनाथ दुधाराम, २) माने दिलीप विठ्ठलराव, ३) सोनवणे भगवान काकासाहेब, ४) शेख शब्बीर मन्सब, ५) सोनवणे माधव सर्जेराव,६) तिडके परमेश्वर दत्तात्रय, ७) नागरगोजे भास्कर धोंडीराम, ८) क्षिरसागर आनंद सुभाष, ९)राठोड अंकुश दगडु, १०) गोरे वसंत भुजंगराव, ११)सौ. देसाई सुनिता काकासाहेब, १२) सौ. कटाळे राधाबाई नामदेव, १३) सौ. हावळे शकुंतला बाळासाहेब, १४)सौ.देशमुख संध्या मंगेश

**तज्ञ संचालक** :- १) सुनिल बापुराव सिरसाट २) चौधरी मुजफ्फर सुलतान
सर्व कर्मचारी वृंद


निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
AttachExpress.IN






# बाळापूर नगरीत पूनमताईंचा सखी-संवाद !

**आत्ताच एक्सप्रेस**
**धर्माबाद/गंगाप्रसाद सोनकांबळे/** शहरातील बाळापूर नगरीत माजी जि.प. सदस्या तथा नायगाव विधानसभेचे विद्यमान आमदार राजेश पवार यांच्या सुविद्य पत्नी सौ. पुनमताई पवार यांनी बाळापूर परिसरातील महिलांसोबत सखी भेट कार्यक्रमांतर्गत संवाद साधला असून आपापल्या परिसरातील भौतिक सुविधांच्या अभावावर थेट उपस्थित महिलांसोबत संवाद साधला. यावेळी उपस्थित महिलांनी सभोवतालच्या सोयीसुविधेंच्या अभावाबद्दल मत मांडले त्यामध्ये रस्ते,नाल्या,स्मशानभूमी,रोजगार आणि स्वच्छतेबाबतीत सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.

सबंध देशभरात सध्या दिवाळीचा सण उत्साहात साजरा होत असून सणासुदीच्या दिवसांत चांगल्या संख्येने महिला या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याचे पाहून हार-सत्कारामध्ये वेळ न घालवता थेट उपस्थित सखींसोबत त्यांनी संवाद साधला.

यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष गुलाब मोरे,शहराध्यक्ष चक्रेश पाटील बन्नाळीकर, रविंद्र पोटगंटीवर, विजय डांगे, संतोष मोरे, माजी नगरसेवक संजय पवार, सायरेड्डी गंगाधरोड, सतीश मोटकुल, चैतन्य घाटे, यांसह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यभरात झालेली अतिवृष्टी व उद्भवलेली पूरपरिस्थिती लक्षात घेता गावशेजारीला ओढे, नाल्यांचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याचा पूनमताईंनी नुकताच १८ तारखेला पार पडलेल्या वाढदिवसानिमित्त संकल्प केला आहे. याअंतर्गत येत्या डिसेंबर महिन्यापासून उपरोक्त कामासाठी लागणारे जेसीबी,मशीन आधी उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**महसूलमंत्र्यांकडून दिवाळी भेट**

# ४७ अधिकाऱ्यांना बढत्या; महाराष्ट्राला मिळाले ४७ नवे अपर जिल्हाधिकारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी**/ राज्याच्या महसूल विभागातील ४७ अधिकाऱ्यांना बढत्या देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, महाराष्ट्राला ४७ नवे अपर जिल्हाधिकारी मिळाले आहेत. तब्बल गेल्या १० वर्षांपासून अधिकाऱ्यांच्या बढत्या रखडल्या होत्या. ऐन दिवाळीच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारकडून आज शासन आदेश जारी करत अधिकाऱ्यांना दिवाळी भेट देण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल अधिकाऱ्यांना पदोन्नतीची दिवाळी भेट दिली आहे. तत्पूर्वी आज मंत्रालयातील दालनात जाऊन बावनकुळे यांनी राज्यातील सर्वच जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरेन्सिंगद्वारे संवाद साधला.

देशभरात दिवाळीचा उत्साह असून कामगार, कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनसही मिळाला आहे, तर अद्यापही काहींना दिवाळी भेटवस्तू दिल्या जात आहेत. आता, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूलमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिवाळी भेट दिली आहे. हसूल विभागातील ४७ अधिकाऱ्यांना बढत्या देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, महाराष्ट्राला ४७ नवे अपर जिल्हाधिकारी मिळाले आहेत.

सामान्य प्रशासन १५ ऑक्टोबर रोजीच्या इतिवृत्तान्वये, आस्थापना मंडळ (क्रमांक २) यांनी अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या पदोन्नतीच्या पदाची पात्रपात्रता तपासून निवडसूची वर्ष २०२५-२६ मध्ये अपर जिल्हाधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी एस २५-१ ७८,८००- २,०९,२००/-) या संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (गट-अ) (वेतनश्रेणी एस २७-११,२३,१००-२,१५,९००/-) या संवर्गात नियमित पदोन्नती कोट्यातील रिक्त पदांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे, असे शासन आदेशात म्हटलं आहे.

३० दिवसांत नव्या पदावर हजर राहण्याची सूचना

दरम्यान, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६३ (६) (३) मधील तरतुदनुसार पदोन्नत अधिकारी ३० दिवसांचे आत रूजू न झाल्यास सदरचे अधिकारी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र राहतील. १५. उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रूजू झाल्याबाबतचा अहवाल revenuemaharashtra.gov.in या ई-मेलव्दारे/टपालाव्दारे शासनास त्वरीत कळवावे, असेही आदेशात म्हटले आहे.

महसूल विभाग जनतेच्या आशा, आकांक्षांना मूर्तरूप देणारा विभाग आहे. हा विभाग अधिकाधिक जनताभिमुख व्हावा. पारदर्शी रहावा, यासाठी आपण सगळे मिळून प्रयत्न करू. सर्वसामान्य जनतेशी थेट संबंध येणाऱ्या मोजक्या शासकीय विभागांपैकी आपला हा विभाग महत्वाचा घटक आहे. तो अधिक बळकट व्हावा, कार्यक्षम व्हावा आणि त्यातून राज्याची प्रगती उत्तरोत्तर व्हावी, असा संकल्प आपण सारे मिळून दीपपर्वाच्यानिमित्ताने करूया, असे म्हणत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयातील सहकाऱ्यांसमवेतचा फोटो शेअर केला आहे.

**महसूलमंत्र्यांचा अधिकाऱ्यांशी संवाद**

मंत्रालयातील दालनातून राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच नोंदणी व मुद्रांक विभागातील नोंदणी महानिरीक्षक ते दुय्यम निबंधकपदावरील सर्व अधिकारी व भूमीअभिलेख विभागातील जमाबंदी आयुक्त ते भूमिअभिलेख उपअधीक्षक अशा सुमारे एक हजार सहाशेवर अधिकारी कर्मचाऱ्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे मंत्री बावनकुळे यांनी आज सकाळी संवाद साधला. महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे व मंत्रालयातील अधिकारी यावेळी उपस्थित होते.













**कार्यकारी अभियंता**

**सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग छत्रपती संभाजीनगर**

**यांचे कार्यालय दुरध्वनी क्रमांक-०२४०-२३३१२८८**

ई-मेल westaurangabad.eemahapwd.gov.in वेब साईट www.mahawd.gov.in

**ई-निविदा सुचना क्र.२९ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन सक्षम वर्गातील कंत्राटदार यांच्याकडुन खालील कामाकरीता डइऊ/एझउ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. (एकुण ०१ कामे)

अ) https://pwd.maharashtra.gov.in
ब). https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग छत्रपती संभाजीनगर**




# सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडून आमदारांना २ कोटींचा विकासनिधी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा सदस्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून प्रत्येकी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून वितरित केला आहे.सामाजिक न्याय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या योजनेद्वारे दलित वस्त्यांमध्ये विविध विकासकामे केली जातात. लोकप्रतिनिधींना त्यांच्या मतदारसंघातील सामाजिक विकासासाठी निधी देण्यात येतो.

**दलित वस्त्यांतील विकासकामांना मिळणार गती**

मागील काही महिन्यांपासून लोकप्रतिनिधींकडून निधीची मागणी होत होती. उपलब्ध निधी आणि मागणी यामध्ये समतोल राखत, सामाजिक न्याय मंत्री शिरसाट यांनी आमदारांना दोन कोटींचा निधी मंजूर केला आहे.



हा निधी वितरित झाल्याने दलित वस्त्यांतील विकासकामांना गती मिळणार असल्याचे सामाजिक न्याय मंत्री शिरसाट यांनी सांगितले.

## मित्रासमोर तरुणीवर सामूहिक अत्याचार, पान नं.१ वरुन...

१४ ऑक्टोबर रोजी एक तरुणी आणि तिच्या मित्रासोबत झाडाखाली गप्पा मारत बसले होते. त्यावेळी काही विकृत मनोवृत्तीच्या तरुणांनी त्यांना पकडत तरुणीवर अत्याचार केला. यावेळी तरुणीजवळ असलेली रोकड आणि इतर साहित्य देखील काढून घेतले. या घटनेने एकच खळबळ माजली आहे.

कल्याणमध्ये एका २९ वर्षीय तरुणीवर लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपी प्रियकराने केवळ अत्याचारच केला नाही, तर पीडित तरुणीचा मोबाईल हॅक करून तिच्यावर पाळत ठेवली आणि तिचे अश्लील व्हिडीओ बनवले. एवढंच नाही तर तरुणीच्या कुटुंबीयांनाही धमक्या देत ब्लॅकमेल केल्याचं समोर आलं आहे. मोबाईलमध्ये साठवलेले अश्लील व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागल्यानंतर संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश झाला आहे. विनीत गायकर असे या आरोपी प्रियकराचे नाव असून कल्याण खडकपाडा पोलिस ठाण्यात त्याच्या विरोधात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आरोपी हा राजकीय पक्षाचा पदाधिकारी असल्याची माहिती आहे.





























हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813